The Poona Press
Owners Association Ltd.

Affiliated to AIFMP, New Delhi and
Maharashtra Mudran Parishad

दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशन लि.चे

# मुद्रण प्रकाश

84th Year
June-July 2022

मुद्रण, प्रकाशन व अनुषंगिक व्यवसायासंबंधी माहिती पुरविणारे
मुद्रकांनी मुद्रकांसाठी चालविलेले सर्वात जुने मासिक



Signing an agreement between The Poona Press Owners Association Ltd. and TOYOINK for the dealership of JPN Ink with TOYO INDIA LTD.



# LED UV

Energy Efficient Solutions for a Brighter Tomorrow



**Features:**

- Reduced Energy consumption
- Increased productivity & reduction of printing defects
- LED UV Inks suitable for Paper & Metalized Paper (PET/PP/PVC)

TOYO INK INDIA PRIVATE LIMITED | info@toyoinkindia.com | www.toyoinkindia.com

The Poona Press
Owners Association Ltd.

**कार्यकारी मंडळ**

| | | |
|---|---|---|
| श्री. रवींद्र दि. जोशी | अध्यक्ष | ९८२२०८२६४८ |
| श्री. शेखर सं. धुमाळ | उपाध्यक्ष | ७०२०६६३२१२ |
| श्री. तीर्थराज ज. जोशी | चिटणीस | ९८२२०२७३९४ |

**मुद्रण साहित्य भांडार समिती**

| | | |
|---|---|---|
| श्री. संजय आ. सावंत | चिटणीस | ९४२२८८१८८४ |
| श्री. कृष्णा द. उत्तेकर | सदस्य | ९४२२५१२७१३ |
| श्री. कृष्णा रा. जागडे | सदस्य | ७७९८४६०२४० |

**वास्तू समिती**

| | | |
|---|---|---|
| श्री. दीपक म. ढोले-पाटील | चिटणीस | ९४२२०८५८९० |
| श्री. मोहन ह. फडतरे | सदस्य | ९८२२८२९३९३ |
| श्री. राहुल द. मारुलकर | सदस्य | ९८२३०१५२०८ |

**मुद्रणप्रकाश समिती**

| | | |
|---|---|---|
| डॉ. गणेश मा. दात्ये | संपादक | ९८२३१२६१५० |
| श्री. विक्रम प्र. गोगावले | संपादक | ९८२२५१५१५९ |
| श्री. नंदकुमार पां. नवले | सदस्य | ९८२२०९९३५७ |

**शिक्षण समिती**

| | | |
|---|---|---|
| श्री. विनय र. कळसकर | चिटणीस | ९८२२०३६०३५ |
| श्री. मंदार मु. उगार | सदस्य | ९८२२००१७९० |
| श्री. गिरीश ना. राव | सदस्य | ९८२२०३२३३० |

**ग्रंथालय व प्रकाशन समिती**

| | | |
|---|---|---|
| श्री. निलेश प्र. घोडके | चिटणीस | ८८८८९१०१११ |
| श्री. किशोर प्र. गोरे | सदस्य | ९९२२५५२२४४ |
| श्री. राजेंद्र तु. सुपे | सदस्य | ९३७२८७२८८१ |


## अं । त । रं । ग


दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशनचा वर्धापन दिन उत्साहात साजर ............................ 5

AGRICULTURAL WASTE MATERIAL FOR PACKAGING APPLICATION ......... 6

थेंब जाणे म्हणजे थेंब थेंब जात राहणे .................... 8

स्टार्टअप विस्तारातून अर्थव्यवस्थेला बळकटी ........... 9

Are we KILLING our own KIDS ............. 11

गीता प्रेस ................................................ 13



**लेआऊट-डिझाईन :** अमोघ आर्टस्. फोन : ९३२६०८६२८५

**संपादक, मुद्रक आणि प्रकाशक :**
डॉ. गणेश मा. दात्ये यांनी व्ही. जोशी ॲण्ड को., पुणे ४११००२ येथे छापून दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशन लि., २०९/ब-४, नवी पेठ, शरद पंडित पथ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.
फोन : ०२०-२४४७१७७७, २४४३०४६०

Email : mudranprakash@gmail.com
**www.pressownerspune.org**

'मुद्रणप्रकाश'मधील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**केवळ संस्थेचे सभासद व अंतर्गत वितरणासाठी**


# संपादकीय



**सर्व सभासद बंधु आणि भगिनींनो,**

आपल्या संस्थेच्या इतिहासात पुन्हा एक मानाचा तुरा नुकताच रोवला गेला आहे. आपण गेली १० वर्षे टोयो कंपनीची शाई अत्यंत अल्पदरात आपल्या सभासदांना विकत आहोत. त्यांच्याशी असलेल्या संबंधांमुळे आता आपल्याला टोयो कंपनीची JPN शाईची डिलरशिप नुकतीच मिळाली आहे. भांडार समिती याकरिता अभिनंदनास पात्र आहेच पण संस्थेचे अध्यक्ष श्री. रवींद्र जोशी, चिटणीस श्री. तीर्थराज जोशी, भांडार समिती चिटणीस श्री. संजय सावंत व इतर भांडार समिती सदस्य ह्यांचा मोलाचा वाटा आहे. सर्वांत महत्त्वाचे हे की आपण सर्व सभासद ही शाई खरेदी करत आहात म्हणूनच हे शक्य होत आहे. आपणास विनंती की २०-२५ टक्के कमी दरात मिळत असल्याने आपण ही शाई नक्की खरेदी करावी.

नुकत्याच झालेल्या GST Council च्या बैठकीमध्ये पुन्हा प्रिंटिंगमधील काही उत्पादनांना दरवाढ करून ती सरसकट १८ टक्के करण्यात आली आहे. अधिकच मंदीच्या गर्तेमध्ये सापडलेल्या ह्या व्यवसायाचे यामुळे कंबरडेच मोडले आहे. मूळ व्यवसायाला लागणारा माल म्हणजे कागद यावरचा कर मात्र १२ टक्के आहे तर प्रिंटिंग करून दिल्यावर त्या तयार होणाऱ्या मालाचा दर हा किमान तेवढाच पाहिजे, पण व्यावसायिकांचे संख्याबळ कमी असल्यामुळे सरकार याबाबत विचार करायला तयारच होत नाही. या सर्वांमुळे ग्राहक Without Bill काम करण्याचा आग्रह धरत आहे. तसेच GST देण्यास अनेक ठिकाणी नकार येत आहे. मधल्यामधे मुद्रक भरडला जात आहे, खिशातून १८ टक्के टॅक्स देणे कोणालाही परवडणारे नाही. खरेतर टॅक्सचा दर जास्त होत गेला तर टॅक्स वाचवण्याकडे कल राहतो हे त्रिवार सत्य सरकार व GST Council च्या लक्षात कसे येत नाही हाच मोठा प्रश्न आहे.

अजूनही नियमाने धंदा करणारे कायम अडचणीत टाकले जातात व चोरी करणारे कायम मजेत जगतात ही वस्तूस्थिती नाकारता येत नाही. यामुळे खरेतर नोटबंदीनंतर झालेल्या डिजिटल करन्सी वापरण्याच्या प्रक्रियेला पुन्हा खिळ बसेल अशी भीती निर्माण झाली आहे. AIFMP च्या माध्यमातून आपण याकरिता प्रयत्न करत आहोत पण आपल्यापैकी काही लोकांचे जर राज्यकर्त्यांशी संपर्क असतील तर त्यांनी ह्या गोष्टी तिथपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

धन्यवाद...

आपला,
**गणेश मा. दात्ये**
**संपादक**
मोबाईल : ९८२३१२६१५०

# PAMEX 2023

International Exhibition on Printing and Allied Machinery Industries

Of the Printers - For the Printers - By the Printers




**Organised By:**

ALL INDIA FEDERATION OF MASTER PRINTERS

**In Association With:**

PRINT-PACKAGING.COM (P) LTD.

**Print-Packaging.com (P) Ltd.**

**Mumbai :** F 101, Tower No. 7, First Floor, International Infotech Park, Vashi Railway Station, Vashi, Navi Mumbai 400 705.

Tel : 91-22-27812093, 27812619, 27812657

Fax : 91-22-27812578

Email : info@print-packaging.com

www.Pamex.in

# अध्यक्षीय मनोगत



**सन्माननीय सभासद,**
**सप्रेम नमस्कार !**

आपल्या संस्थेला नुकतीच १९ मे २०२२ रोजी १०३ वर्षे पूर्ण झाली. एखादी संस्था इतकी वर्षे काम करत आहे हे सहसा पाहिला मिळत नाही. खरेतर आपण सर्व जण खूप भाग्यवान आहोत की आपण अशा संस्थेचे सभासद आहोत की जी पूर्वजांच्या कामामुळे मजबूत अशा आर्थिक पायावर उभी आहे. गेली १५ वर्षे या ना त्या पदावर मला काम करण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्यच समजतो. काही कारणाने जेव्हा माझ्या टीमने संस्थेची जबाबदारी स्वीकारली त्या वेळी संस्थेची आर्थिक परिस्थिती विशेष चांगली नव्हती. पण आम्ही सर्वांनी एकदिलाने काम करून आज भक्कम आर्थिक पाया पुन्हा निर्माण केला. त्या सर्वांमध्ये जे कुठल्याही संस्थेला शक्य झाले नाही ते आम्ही भांडाराच्या माध्यमातून घडवून आणू शकलो. आज १० वर्षांपेक्षा जास्त काळ दरमहिना अंदाजे ५/६ टन आपण टोयो इंकची शाई सभासदांना किमान १५ ते २५ टक्के कमी दराने देत आलो आहोत आणि हासुद्धा एक विक्रमच म्हणावा लागेल.

याच दिशेने पुढचे पाऊल म्हणून आपल्या कामाचे कौतुक म्हणून टोयो इंक जपान यांच्याशी करार करून आपण म्हणजेच मुद्रण साहित्य भांडार या आपल्या संस्थेला डायरेक्ट डीलरशिप देऊ केली आहे. अजून काही प्रमाणात आपण ही इंक स्वस्त देऊ शकणार आहोत याबद्दल मला खूप आनंद होत आहे.

सन २०१८-१९ साली ऑल इंडिया फेडरेशन ऑफ मास्टर प्रिंटर्स या आपल्या शिखर संस्थेचे अध्यक्ष पद भूषविण्याची संधी मला मिळाली. त्या वर्षी केलेल्या कामाचे खूप कौतुक झाले. तेथील सर्व सीनिअर लोकांच्या आग्रहाखातर ही संधी मला पुन्हा प्राप्त होण्याची शक्यता आहे. आपण सर्वांनी मला जे सहकार्य केले व माझ्यावर विश्वास दाखवला त्यामुळे मला ते पद पुन्हा प्राप्त झाल्यावर माझे AIFMP भवन निर्मितीचे स्वप्न मला साकार करता येणार आहे.

आपल्या सर्वांचे मनःपूर्वक आभार...

**रवींद्र दि. जोशी**
**अध्यक्ष**

The Poona Press Owners Association Ltd.

## सर्व मुद्रक बंधूंनी भांडारातून जास्तीत जास्त साहित्य खरेदी करावे ही विनंती.




# TOYO JPN

**4 Colour Process Ink for Offset Printing**

Any purchase between 1 to 99 kg. ₹ **1520/-** for 1 set of 1 Kg. CMYK

Any purchase above 100 kgs.

₹ **1492/-** For 1 Set of 1 Kg. CMYK

Mudran Black Ink available in 5 kgs & 20 kgs.



## BINDING MATERIAL

**Binding Cloth [Blue / Red]** (42" x 28 mtr.) Rs. 28/- per mtr.

| | | |
|---|---|---|
| **Binding Paste :** | Blue | Rs. 15/- per kg. |
| | White | Rs. 19/- per kg. |

**Stitching Wire**

**Only Coil (Without Spool)**

| | |
|---|---|
| Gauge / No. 20, 22, 24 | Rs. 218/- per coil |
| Gauge / No. 26 | Rs. 225/- per coil |

**Coil with Spool**

| | |
|---|---|
| Gauge / No. 20, 22, 24 | Rs. 254/- per coil |
| Gauge / No. 26 | Rs. 259/- per coil |
| DEUCO No. 26 | Rs. 295/- per coil |

## ADHESIVES

**Perfect Binding Gum**

| | | |
|---|---|---|
| Main / Spine : | Pigmented | Rs. 240/- per Kg. |
| | | Rs. 265/- per Kg. |
| Side | Non Pigmented | Rs. 285/- per kg. |
| Spine / Side | Non Pigmented | Rs. 285/- per kg. |

*(Packing : 30 kg. Bag)*

**Jelly Gum / Glue** Rs. 169/- per kg.
For semi-auto case binding machine
*Box of 25 Kgs. (2.5 kg. x 10 cakes)*

**RoyalCol** Rs. 80/- per kg.
Waterbase Adhesive



## STRAPPING (PACKING) PATTI

| | 9 mm & 12 mm |
|---|---|
| 1 Roll to 19 Rolls | Rs. 450/- per Roll |
| 20 Rolls & above | Rs. 400/- per Roll |

*(Packing : 1 Bundle of 2 Rolls)*



*GST will be extra as applicable.* • *Special Rates are subject to payment against delivery.*

The prices mentioned are subject to change without prior notice and till stock lasts.

| श्री. संजय आ. सावंत | श्री. कृष्णा द. उत्तेकर | श्री. कृष्णा रा. जागडे |
|---|---|---|
| चिटणीस | सदस्य | सदस्य |

# मुद्रण साहित्य भांडार

'मुद्रक भवन', १०७८, सदाशिव पेठ, शनिपाराजवळ, पुणे - ४११०३०
फोन : ०२० - २४४७१७७७ / २४४३०४६० / ९९२३००१५५८ • Email : ppoamsb@gmail.com

# दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशनचा वर्धापनदिन उत्साहात साजरा

१९ मे हा संस्थेचा वर्धापनदिन. कोविड-१९ ह्या साथीच्या रोगाच्या प्रादुर्भावामुळे मागील दोन वर्षे, म्हणजे २०२० आणि २०२१ आपण वर्धापनदिन साजरा करू शकलो नाही. ह्या पार्श्वभूमीवर ह्यावर्षी मात्र संचालक मंडळाने वर्धापनदिन चांगल्या प्रकारे साजरा करण्याचे ठरवले होते.

१९ मे २०२२ संस्थेच्या १०३व्या वर्धापनदिनी, संस्थेच्या १०७८, सदाशिव पेठ येथील वास्तूला विद्युत रोषणाई करण्यात आली होती, तसेच कार्यालयसुद्धा सजविण्यात आले होते. संस्थेच्या वास्तूत सत्यनारायण पूजा आयोजित केली होती. सौ. व श्री. डॉ. गणेश दात्ये ह्यांच्या शुभहस्ते सत्यनारायण पूजा करण्यात आली.

सकाळच्या प्रहरात संस्थेचे अध्यक्ष श्री. रवींद्र दि. जोशी, चिटणीस श्री. तीर्थराज ज. जोशी व इतर मान्यवर संचालक उपस्थित होते. ह्याच शुभदिनाचे औचित्य साधून संस्थेच्या वेबसाईटचे उद्घाटन करण्यात आले. वेबसाईटच्या पुनर्बांधणीमध्ये श्री. राहुल गोरे, श्री. निलेश घोडके, श्री. विक्रम गोगावले ह्या संचालकांनी पुढाकार घेतला होता. ह्याच शुभदिनी संस्थेच्या 'मुद्रणप्रकाश' ह्या मासिकाचे प्रकाशन मा. अध्यक्ष श्री. रवींद्र दि. जोशी ह्यांच्या हस्ते करण्यात आले.

सर्व निमंत्रकांना सायंकाळी तीर्थप्रसादाचे आमंत्रण देण्यात आले होते. संस्थेच्या सभासद आणि हितचिंतकांनी वर्धापनदिनाच्या तीर्थप्रसाद कार्यक्रमास मोठ्या संख्येने हजेरी लावली. इमारतीवरील विद्युत रोषणाई आणि इमारतीच्या आवारातील पाहुण्यांची वर्दळ ह्यामुळे संस्थेच्या इमारतीचा परिसर फुलून गेला होता.

अशा रीतीने संस्थेचा वर्धापनदिन अत्यंत आनंदात व उत्साहात साजरा झाला. ■










# AGRICULTURAL WASTE MATERIAL FOR PACKAGING APPLICATION



**Mr. Atharva Kulkarni**
PVG COET & GKPWIM
TE Printing

**Guide: Prof. Mrs. Madhura Mahajan**
*HOD Department of Printing Engineering*
*PVG'S COET GKPWIM Pune*

Packaging used to be seen as nothing more than a necessity, a layer to protect the product inside and to transport it from A to B. Packaging contains, protects, preserves, transports, informs, and sells, in many countries it is fully integrated into government, business, and institutional, industrial, and personal use. In ancient times, leaves and bushes were used. By using high-end lightweight, durable, and cheaper material, today's packing industry has evolved exponentially. The industry is continuously searching for packaging solutions that have better strength, are easier to handle, are hygienic, are lightweight, and, most importantly, are sustainable. The major packaging materials are plastic, polystyrene, cardboard, etc. All of these materials are low in cost, light in weight, and durable. The world's growing population has led to large amount of packaging waste, which further contributes to the problem of its disposal and other environmental issues. High-energy consumption (embodied) and environmental problems are associated with packaging materials, which underscores the need to regard the proper use of packaging materials from an environment point of view.

There has been increasing concern regarding environmental problems arising from the widespread use of petroleum-based plastic and extruded polystyrene foam materials for packaging. The current review summarizes recent research progress in developing cellulose packaging material to replace plastics used for cushioning and barrier packaging functions based on pulp fibers. Natural cellulose fibers are bio-based materials with good biodegradability and recyclability which are suitable for packaging application, although they should be selected and processed accordingly to specific need of packaging product, taking into account the environmental, social and economic sustainability. Polystyrene is non-biodegradable, a biodegradable material that is eco-friendly is being sought as a substitute for packaging and insulation board consumers. Molded pulp is an eco-friendly packaging product popularly chosen nowadays. It is mostly used to replace plastic containers such as polypropylene (PP), polystyrene (PS) and polyethylene (PE). Besides, the non-wood pulps from agricultural crops and residues have been increasingly studied as alternative materials in pulp production. In agricultural countries, abundant sources of non-woods can be obtained from agricultural wastes. Many of them are considered suitable for pulp production due to their high cellulose content, low lignin content, and desirable mechanical properties, for example, oil palm, sugarcane, rice straw, banana stem, bamboo, corn stalk as well as pineapple leaf. Particularly, rice straw, pineapple leaf and banana stem contain





**Fig – Preparation of molded pulp sheets from rice straw, pineapple leaf and banana steam Pulps by using compression molding technique.**

relatively high cellulose content (65–82%) using these as raw materials to produce pulps by using a soda-anthraquinone (AQ) pulping process to prepare molded pulp sheets.


Recent scientific investigation resulted in development of an economically viable, environmentally friendly replacement for polystyrene packaging materials. The packaging material evaluated in a composite containing selected agricultural residues and a specific fungus. The crops and agricultural residues, fungi and/or their constituents have been studied and used to manufacture environmentally friendly products. The combination of agricultural residues and fungi have been evaluated for fungal cultivation and improving bonding properties of agricultural fibers in the manufacture of composites. Using six blends of processed cotton plant biomass (CPB) materials as a substrate for colonization of selected fungi in the manufacture of molded packaging material. The blends were comprised of processed CPB, cotton seed hulls, starch, and gypsum. Nano cellulose made of agricultural waste biomass, i.e. rice straw (RS) and palm empty fruit bunch (PEFB). The Reinforcement of nano cellulose obtained from agricultural waste in the production of bioplastic bags can improve mechanical and permeability properties of the bag.

Nano cellulose obtained from agricultural waste in the production of bioplastic bags can improve mechanical properties, Permeability of the bag and also help environment from harmful plastic chemical. The use of agricultural crops, residues, cotton-based fungal and nano cellulose from agricultural waste material can surely replace polystyrene packaging. These agro wastes have become an attractive alternative sources for the production of value-added products. With the development of science knowledge and technology, the applications of agro wastes discovered in numerous industries for sustainable and eco-friendly future.

## References


1. Rattanawongkun, P., Kunfong, N., Klayya, S., Chotimarnon, T., Duangphet, S., Tawichai, N. & Soykeabkaew, N. (2020). Comparison of molded pulps from rice straw, pineapple leaf and banana stem pulps. *SCIENCEASIA*, *46*, 79-84.
2. Holt, G. A., Mcintyre, G., Flagg, D., Bayer, E., Wanjura, J. D., & Pelletier, M. G. (2012). Fungal mycelium and cotton plant materials in the manufacture of biodegradable molded packaging material: Evaluation study of select blends of cotton byproducts. *Journal of Biobased Materials and Bioenergy*, *6*(4), 431-439.
3. Su, Y., Yang, B., Liu, J., Sun, B., Cao, C., Zou, X.,& He, Z. (2018). Prospects for replacement of some plastics in packaging with lignocellulose materials: A brief review. *BioResources*, *13*(2), 4550-4576.
4. Iriani, E. S., Permana, A. W., Yuliani, S., Kailaku, S. I., & Sulaiman, A. A. (2019, September). The Effect of Agricultural Waste Nanocellulose on The Properties of Bioplastic for Fresh Fruit Packaging. In *IOP Conference Series: Earth and Environmental Science* (Vol. 309, No. 1, p. 012035). IOP Publishing.
5. *Sustainable packaging*. (n.d.). Wikipedia.Org. Retrieved May 15, 2021, from https://en.wikipedia.org/wiki/Sustainable_packaging
6. *Bioplastic from agricultural waste*. (n.d.). Researchgate.Net. Retrieved May 15, 2021, from https://www.researchgate.net/publication





# थेंब जाणे म्हणजे थेंब थेंब जात राहणे

सुधाकर घोडेकर / दिलीप देशपांडे

**बचत म्हणजे कमाईची दुसरी बाजू :**

तुमच्या संसाधनांचा जसा पुरेपूर वापर तुमचा फायदा वाढवत असतो, तशीच बचतही तुमचा फायदा करत असते. उत्पादनाची गुणवत्ता सांभाळूनही बचत होऊ शकते. काही लाख शर्ट बनवणारी कंपनी असेल आणि प्रत्येक शर्टामागे केवळ दोन इंच रुंदीच्या कापडाची बचत करत असेल, तर एकूण किती बचत होत असेल? रोज विजेचे एक युनिट कमी वापरणारी कुटुंबे वर्षाकाठी खूप मोठी बचत करत असतात. जर तुम्ही उत्पादक असाल, तर लागणारे रॉ मटेरियल किती वाया जाते आणि किती वाचवणे शक्य आहे याचा शोध घ्यावाच. वाया गेलेले रॉ मटेरियल वेगळ्या भावाने घेतलेले असते आणि भंगारात गेल्यावर त्याला वेगळा भाव मिळत असतो. अनेक गोष्टी वाया जात असतात. त्यांचा एकत्रित परिणाम खूप मोठा असतो.

या संसाधनातला आणखी एक भाग म्हणजे तुमचे भांडवल. तुम्ही कदाचित बँकेकडून खेळते भांडवल म्हणून कॅश क्रेडिट घेतले असेल. तुमच्या उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल अनेक कंपन्या किंवा उद्योग मोठ्या प्रमाणावर मागवतात. पूर्ण ट्रकभर माल येतो आणि गोडाऊनची जागा व्यापतो. हा माल तुम्हाला तीन महिने पुरणार असतो. असा अधिक मागवलेला मालही तुमचे अप्रत्यक्ष नुकसान करत असतो. तुमचे भांडवल अडकते, त्यावर बँकेच्या व्याजाचे मीटर सुरू असते, गोडाऊनच्या जागेचा वापरही काहीतरी खर्ची पाडत असतो. मग जसा लागेल तसाच माल मागविणे हा सुज्ञपणा ठरतो. आपल्या उत्पादनाचे स्वरूप पाहून किमान किती मालाची आवश्यकता आहे हे ठरू लागणारा माल वापरण्याच्या थोडाच काळ अगोदर पोहोचतो. यामुळे कंपन्यांचा फार मोठा फायदा होत आहे. सगळ्यांना एकसारखा नियम असणार नाही; परंतु हा विचार कोणत्याही उद्योगाचा फायदा करून देऊ शकतो.

**डोळसपणे खरेदी करा :**

तुम्ही विक्रेते असा की उत्पादक, तुम्ही खरेदी करतच असता. ही खरेदी करताना जर चातुर्याने, खरेदीची किंमत कमी करू शकला, तर होणारा फायदाही मोठा असतो. जर उद्योजकाकडे रोख रकमेची चणचण नसेल किंवा पैशाची बँकेकडून व्यवस्था झालेली असेल, तर खरेदी करताना भावाबाबत निगोशिएट करता येते. कल्पना येण्यासाठी ढोबळ उदाहरण घेऊ. जर लगेच पैसे देणार असाल आणि त्यामुळे चार-पाच टक्के किंमत कमी करून माल मिळत असेल, तर ते किती फायदेशीर ठरते. पाच लाखांचा माल घ्यायचा आणि तीस दिवसांचे क्रेडिट मिळवायचे. त्याऐवजी लगेच पैसे देऊन तीन टक्के जरी किंमत कमी करून मिळाली, तरी पंधरा हजार लाभ होतो. बँकेकडून पैसे घेतले असल्यास महिना एक टक्का कॅश क्रेडिटवर व्याज द्यावे लागेल. म्हणजे पाच लाखांवर केवळ पाच हजार व्याज जाईल. निव्वळ नफा यातून अतिरिक्त दहा हजारांचा होईल. संपूर्ण वर्षभराची खरेदी विचारात घेतली, तर ही खरेदीत वाचविलेली रक्कम खूप मोठी होते. जर तुमच्या करंट खात्यावर शिल्लक असेल, तर हा नफा आणखीनच होतो. तुमच्या खात्यावरच्या शिलकीवर व्याज मिळणार नसते. त्याबदल्यात तुम्ही इतकी मोठी बचत करू शकता.

**बचतीच्या जागा अनेक :**

बचत करण्यासाठी कोणत्याही उद्योगाला अनेक संधी उपलब्ध असतात. त्याचा त्याने लाभ घेतलाच पाहिजे. तुमच्याकडे असलेली अतिरिक्त रोख शिल्लक कारणी लावलीच पाहिजे. बँकेच्या कॅश क्रेडिटचा नियोजनबद्ध आणि कार्यक्षम वापर केला, तर वर्षाकाठी बँकेला द्याव्या लागणाऱ्या व्याजात मोठी बचत झालेली दिसेल. जर अतिरिक्त रोकड असेल, तर ती करंट अकाउंटमध्ये ठेवण्यापेक्षा गुंतवलेली चांगली.

बचत करणे म्हणजे टाळता येण्याजोगे वेस्टेज टाळणे. जर गांभीर्याने आणि प्रत्येक गोष्टीचा सखोल अभ्यास केला, तर अनेक ठिकाणी सुधारणा करणे शक्य आणि आवश्यक आहे हे जाणवेल. पुढे काही गोष्टी दिल्या आहेत, त्यावर लक्षच ठेवायला पाहिजे.

१) कच्चा माल खरेदी करताना गुणवत्तेला धक्का न लागता कमीत कमी किमतीत खरेदी करणे. कोणतेही क्रेडिट न घेता लगेच पैसे देण्यामुळे जर आणखी किंमत कमी होत असेल तर आणि शक्य असेल तर अवश्य विचार करावा.

२) गरजेइतक्याच कच्च्या मालाची खरेदी करावी. अधिक खरेदी केल्यामुळे पैसे गुंतून पडतात, गोडाऊनची किंवा फॅक्टरीची जागा अडते, अधिक काळ माल पडून राहण्याने प्रसंगी खराब होतो. नेमकी गरज किती आणि केव्हा आहे यासाठी आपल्या उत्पादन शृंखलेचा अभ्यास हवा. टोयोटाच्या 'जस्ट इन टाईम'सारखी संकल्पना राबवावी. सप्लायरकडून येणारा कच्चा माल, सुटे भाग हे नेमक्या वापरण्याच्या वेळीच येतील याचे नियोजन करावे. जगातल्या अनेक कंपन्या आता ही प्रणाली वापरतात आणि कल्पना येणार नाही इतकी बचत करत आहेत. या प्रणालीच्या आधारावर आवश्यक आणि सुयोग्य अशी स्वतंत्र प्रणाली निर्माण करावी.

*पान १० वर...*

# स्टार्टअप विस्तारातून अर्थव्यवस्थेला बळकटी

वंदना धर्माधिकारी

**सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग यांना अर्थव्यवस्थेचा कणा असे संबोधिले जाते. त्यास उत्तम पाठिंबा दिला गेला आणि देशात नवीन प्रकारचे उद्योग सुरू झाले. गरज तसा पुरवठा होताना एमएसएमई सेक्टर गतिमान झाला. इथे चिनी मालावर टाकलेला बहिष्कार महत्त्वाचा ठरला अहे. आपल्या देशाला, समाजाला ज्याची कशाची गरज असेल ते सर्वच्या सर्व आपल्याच मातीत कुठेतरी तयार केले गेले पाहिजे असे माननीय पंतप्रधानांचे शब्द अनेकांनी झेललेले दिसतात. टेक्नॉलॉजीचे साहाय्याने जुन्याचेदेखील नवीन सुंदर रूपडे बाजारात आले. शिवाय टिकाऊ माल, देशी माल, आपल्या लोकांनी केलेला ही भावना त्यास चिकटली असल्याने मागील काही दिवसांत स्वदेशी विचार मोठ्या प्रमाणात समाजात भिनलेला जाणवतो आहे. त्यासाठी कौतुक आहेच. आणखी बरेच काही करायचे आहे हेही लक्षात पाहिजे.**

### १. स्टार्टअप - उद्यमारंभ :

सर्व बाजूंनी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांना अधिकाधिक सवलती, मदत, नियमांत बदल, त्यातही महिलांना प्रोत्साहन असे बरेच काही सरकारकडून देण्यात आले आहे. त्या उद्योजकांनी उमेदीने व्यवसायवृद्धी केलेली दिसली. त्याच उद्योगक्षेत्रात वेगळीच क्रांती म्हणावी अशा गोष्टींचा बोलबाला सध्या होत आहे. त्याची गती दिवसेंदिवस वाढत आहे. ते म्हणजे स्टार्टअप - उद्यमारंभ नव्या उद्योगाची सुरुवात. आधीचे उद्योग आणि नवीन उद्योगाची सुरुवात यात फरक नक्कीच आहे. त्याला मोठे करण्यात येत आहे. ते काय व कसे? बघताना जाणवते की ही पाऊलवाट हमरस्ता होऊ घातला आहे. भारतात त्यामध्ये विशेषत्वाने बदल दिसत आहेत. आज आपण जगात तिसऱ्या नंबरवर आहोत. पुढे चीन व अमेरिका आहेत. मोदी सरकारने मेक इन इंडिया नामक संकल्पना उचलून धरली आणि जवळपास ५०,००० नवीन स्टार्टअप भारतात सुरू झाले. त्यांनी २०१४ ते २०२१ कालावधीत भारताने सर्व युरोपियन देशांना मागे टाकले आहे. याच्याही पुढची पायरी म्हणजे त्यापैकी अनेकांनी युनिकॉर्न टप्पा गाठला आहे. हे यश खूप मोलाचे आहे. आज देशाची प्रगती कशी होते याचे हे मोठे उदाहरण आहे. त्याची जाण व ओळख सर्वसामान्यांना व्हायला हवी.



### २. उद्योजकाचा विविधांगी विस्तार :

माणसाची कल्पनाशक्ती एकदम भारी असते असे म्हटले तर जिथे असते तिथेच भरारी घेतली जाते. एखाद्या उद्योगाची वा उद्योजकाची भरारीची सुरुवातीची अवस्था बघितली तर तिथे वेगळेपण जाणवते. उद्योजकाची भन्नाट कल्पना आणि तिचा विविधांगी विस्तार, विचार, व्यवहार, उपयोगिता, आवश्यकता, नावीन्य असे सर्व एकत्रितरीत्या येते. ते सर्व घेऊन व्यवसाय पुढे जाणार असतो. अशा प्रकारे प्रवास करणाऱ्या उद्योगांची दखल घेणे आवश्यक ठरवले गेले ते स्टार्टअपने. कल्पना फलितरूपात आणताना कशी फुलवली जाईल यावर विचार, आधार, मार्गदर्शन व आर्थिक पाठबळ याची सोय करताना स्टार्टअपची भूमिका अहं ठरणारी आहे.

### ३. स्टार्टअपना पाठिंबा - विशेष योजना :

स्टार्टअप म्हणजे नव्याने सुरुवात करणे. एका ठिकाणी इंग्लिशमधील स्टार्टअपची व्याख्या वाचनात आली, ती अशी Startup means the action for process to get something in motion. एखाद्या गोष्टीला गतिमान करण्यासाठी केलेली कृती व त्याची प्रक्रिया म्हणजे स्टार्टअप होय. स्टार्टअप संकल्पना तशी उचलून धरताना भारत सरकारने १६ जानेवारी २०१६ रोजी

स्टार्टअपची घोषणा केली. त्याचे महत्त्व लक्षात घेऊन खंबीर पाठिंबा देण्यासाठी काही विशेष योजना आखल्या गेल्या. देशात मोठा बदल घडविण्याचे ध्येय समोर ठेवून दिलेले प्रोत्साहन यशस्वीरीत्या पुढे जाताना दिसते आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय यांचेतर्फे हे सर्व बघितले जात आहे. सर्व उद्योजकांना सामावून घेण्यासाठी जेम GEM2 पोर्टलचा वापर ऑगस्ट २०१६ मध्ये सुरू केला. या पोर्टलची लिंक जीएसटी पोर्टलद्वारे उपलब्ध केली. त्याने आपोआपच सर्व प्रकारच्या उद्योगांचे रजिस्ट्रेशन जीएसटी पोर्टलवर केले गेले. त्याने उद्योगांचे व उद्योजकांचे, शिवाय ते कोणबरोबर व्यवसायात सहभागी आहेत, व्यवसायवृद्धी करीत आहेत त्याचीही नोंदणी आवश्यक केली. सर्वांची माहिती संकलित केली गेली. त्याने जीएसटी कलेक्शन वाढले. त्याची परिणिती सर्व क्षेत्रातील प्रगती करताना होत आहे. सक्तीच्या नोंदणीचा फायदा उद्योजकांना होताना दिसत आहे. सहजरीत्या व्यावसायिक आपली नोंदणी जेम GEM2वर करू शकतात. अर्ज करूनही नोंदणी करता येते.

व्यवसायवृद्धी करताना आधीचे कायदे, नियम यामध्ये सरकारने मोठ्या प्रमाणात बदल केले. स्टार्टअप फंड सुरू केला. त्याने स्टर्टअपसना मदत करणे सुलभ झाले. यामध्ये गुंतवणूकदार उत्साहाने गुंतवणूक करताना दिसत आहेत. असे विशेष सहकार्य नक्कीच कौतुकाची जमेची बाजू आहे.

### ४. नावीन्यपूर्ण उद्योग निर्मिती :

आत्ताच्या प्रत्येक कामात नवीन टेक्नॉलॉजीवर अधिक भर आहे. टेक्नोसॅवी तरुणाईमध्ये स्टार्टअपची क्रेझ निर्माण झालेली असल्याने नवीन प्रयोग होत आहेत. उद्योगास पोषक वातावरणनिर्मिती आहे. यशस्वी उद्योग प्रेरणादायी आहेत. आपोआप अनुकरण, उत्सुकता, त्यात मी कुठे काय करू शकतो यामधील सहभाग वाढताना दिसत आहे. दूरसंचार क्रांती, मोबाईल बँकिंग वृद्धी, विविध ॲप्स आणि त्यामध्ये रमलेली तरुणाई यांचा एकत्रित परिणाम नावीन्यपूर्ण उद्योगनिर्मितीमध्ये होताना दिसतो. तेच पुढे स्टार्टअपमध्ये समाविष्ट होऊ शकतात.

### ५. स्टार्टअप आणि देशाची अर्थव्यवस्था :

स्टार्टअप विस्तार म्हणजे देशाची अर्थव्यवस्था बळकट करणे होय. ती बँकिंग सेक्टरद्वारेच केली जाते. त्याने बँकांकडे नवनवीन कर्जप्रकरणे वाढीव होत आहेत. यामध्ये सहकारी बँकादेखील आल्या आहेत. त्याचा फायदा बँकांची परिस्थिती सुधारणा होय. तरुणाई याकडे विशेष आकृष्ट होताना दिसते. केवळ शहरात नव्हे तर साधारण गावांमध्येदेखील आता स्टार्टअप नोंदणी करून व्यवसायात प्रवेश करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. तेव्हा बँकांनी व्यवसायवृद्धीसाठी अशा उद्योजकांचा विचार केला पाहिजे. प्रगती आहे नावीन्याची. हे नक्कीच सुचिन्ह होय.

***सौजन्य : व्यापारी मित्र***

## थेंब जाणे म्हणजे थेंब थेंब जात राहणे

*पान ८ वरून*

३) गरज असतील तितकेच कामगार नोकरीस घ्यावेत. तितकेच याचा अर्थ उगा कपात नको. आपल्याकडे असलेल्या सगळ्या कामगारांनी पूर्ण क्षमतेने काम केल्यास आपले उत्पादनाचे उद्दिष्ट पूर्ण होईल हे पाहावे. कामगार भरती करताना नेहमीच मेरिटला प्राधान्य द्यावे. उत्तम कामगार घेताना थोडा अधिक पगार द्यावा. चांगल्या कामगारांमुळे इतरांचीही कामाची पद्धत सुधारते आणि लाभ होतो. कोटींमध्ये किंमत असलेली यंत्रसामग्री घ्यायची आणि कामगार भरताना अधिक पगार द्यावा लागू नये म्हणून दुय्यम दर्जाचा किंवा अननुभवी कामगार घ्यायचा हा वेडगळपणा आहे. आपलेच नुकसान करणारा आहे.

४) यंत्रसामग्री पूर्णपणे वापरली जात आहे, याची खात्री करावी. कामाची आवश्यकता वाटल्यास फेरआखणी करावी. यंत्रसामग्रीची देखभाल करण्यात हलगर्जीपणा करू नये. ते दीर्घकालीन नुकसान करणारे ठरते. जर एखादा पार्ट बदलणे आवश्यक आहे असे वाटले, तर तो लगेच बदलून टाकावा. जुजबी दुरुस्ती करून काम भागवण्यामुळे प्रसंगी मशीन दीर्घ काळ बंद पडून मोठे नुकसान करू शकते. जे सुटे भाग काही कालांतराने झिजतात आणि बदलावे लागतात, त्यांची अगोदरच तजवीज ठेवावी. यंत्र बंद पडल्यावर जागे होणे हे नुकसान करणारेच आहे.

५) इमारतीची डागडुजी, विद्युत उपकरणांची निगा यांकडे अनेक वेळा दुर्लक्ष होत असते. अनेक वेळा नको त्या वेळी हे प्रश्न उभे राहतात आणि सगळीच गणिते कोलमडतात.

६) वसुलीबाबत नेहमीच दक्ष असायला पाहिजे. आपण विकलेल्या मालाचे पैसे ठरलेल्या तारखेनंतर एका आठवड्याने येत असतील, तर मोठे नुकसान सुरू आहे असे समजावे. जर बारा टक्के दराने एक कोटी रुपयांचे खेळते भांडवल बँकेकडून घेतलेले असेल, तर केवळ व्याजापोटी वर्षाला बारा लाखांचे नुकसान होत असते.

'संसाधनांचा पुरेपूर वापर आणि शक्य तिथे बचत' हे धोरण राबविण्यासाठी निश्चय लागतो, शिस्त लागते आणि सातत्यही आवश्यक आहे. तुमची एकूण प्रशासन यंत्रणा अशा पद्धतीने आखली गेली पहिजे की, बचत आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर हे आपोआप घडणारे नित्याचे कर्म होईल. त्यासाठी प्रत्येक वेळी मुकादमासारखे कामगाराच्या मागे उभे राहण्याची आवश्यकता उरणार नाही, की गोडाऊनमध्ये चकरा मारत बसण्याची गरज असणार नाही.

*सौजन्य : 'मी होणारच परफेक्ट बिझनेसमन!' या पुस्तकातून*

# Are we KILLING our own KIDS?





Amit J Kothari
Cell : 9890068887

**Dr. George Land and Beth Jarman were contacted by NASA to develop a creative test to measure the creative potential of NASA's rocket scientists and engineers.** The results were successful for NASA. They got the output they desired.

But the research raised more questions –

- Where does creativity come from?
- Are some people born with it or can it be learned or developed?
- Does it come with experience?

To get further answers to the above questions, the test was used to test the school children. The idea was to check the ability of children to come up with new, different and innovative ideas to the problems they faced.

**The test was given to 1600 children between the age of 4 and 5. About 98% of the kids turned out to be creative geniuses.** To take this research forward, the same kids were tested 5 years later when they turned 10. The result – only 30% kids were now in the genius category of creative problem solving. When the kids were tested at 15 years, the percentage dropped to 12%. **Finally, when it was done with adults, sadly creative geniuses were only 2%!**

To check the validity of these results, this test has been repeated more than a million times and the results have been consistent with 1-2% variation.

It is not fair to blame just the schools or the education system for the same. But as parents, we kill creativity in kids unknowingly. Here are a few examples, which you should be able to relate with —

- Do you stop children doing something, which might spoil their clothes?
- Do you do things on behalf of kids thinking they are too small for it?
- Do you shut the child by raising your voice?
- Do you impede on child's expression when she is talking to herself?
- Do you hit the child if they don't do something according to you?
- Is the child scared of you?
- If the kid jumps on you when you are in a bad mood/ in work, do you accommodate them or get upset?
- Do you allow a kid to complete their sentence or interrupt them thinking that you already understand what they mean?
- Do their creative drawings / illustrations / paintings look stupid to you?
- Do you stop them from doing things they derive a lot of joy from, because your house will get spoilt?
- When the child is stuck, what do you do? Do you

do it for them? Or do you just give them ideas to get it done their ways?

**These might seem very small things to us. But this is what gradually builds their creativity and problem-solving abilities. The kids need to explore on their own. They need to fail! Ultimately such experiences will build their self-belief which is the most important for their future.**

Kids can surprise us with what they can do. Creativity is a born gift to every child on this planet. **Whether we encourage them and nudge them to explore and be amongst 2% of the creative geniuses as adults or we take them towards losing their creativity and be amongst the 98% ordinary people is totally onto us.** Our parenting and inputs are the key!

My strong belief is – in the coming few years, those who are creative geniuses are the ones who will lead the world. They are the kind of brains the world will be looking for and not those who can recite things as is!

**Creative problem solving is the future! It is onto us as parents to decide whether our children will become leaders or followers! If we, as parents subside the creative genius in our own children, it is as good as killing our own child.**




## जुलै महिन्यातील वाढदिवस


| क्र. | सभासदांचे नाव | मुद्रणालयाचे नाव | जन्मदिनांक | दूरध्वनी | मोबाईल |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्री. घोडके गोपाळ ऊर्फ प्रदीप र. | टायपोग्राफिका प्रेस सर्व्हिसेस | ०२/०७/१९५५ | २४३३१७१९ | ९८९०९११४०४ |
| २) | श्री. मते रवींद्र विश्वनाथ | वैशाली प्रिंटर्स ॲण्ड बाईंडर्स | ०४/०७/१९६५ | २४४८५९४८ | ९८२२५४६८०६ |
| ३) | डॉ. दात्ये गणेश माधव | गणेश ऑफसेट प्रा. लि. | ०५/०७/१९६६ | २४४५११४४ | ९८२३१२६१५० |
| ४) | श्री. झावरे राहुल एस. | झावरे क्रिएटिव्ह एन्टरप्रायझेस प्रा. लि. | ०८/०७/१९७६ | २४२६३४८३ | ९८९०१६०१९० |
| ५) | श्री. घाटपांडे शिरीष द. | उज्ज्वल प्रकाशन | १२/०७/१९४९ | २४४५६९०८ | ९९७५५८४३२२ |
| ६) | श्री. भंडारी संदेश कांतीलाल | अनुजा ट्रेडर्स | २१/०७/१९५१ | २४२६७४९३ | - |
| ७) | श्री. कळसकर विनय रत्नाकर | आविष्कार इंडस्ट्रीज | २२/०७/१९६८ | २४४७४४४१ | ९८२२०३६०३५ |
| ८) | श्री. संचेती मयुर संपतलाल | एमस्क्वेअर ॲडव्हर्टायझिंग | २२/०७/१९८८ | - | २०११४९०४९१ |

## ऑगस्ट महिन्यातील वाढदिवस

| क्र. | सभासदांचे नाव | मुद्रणालयाचे नाव | जन्मदिनांक | दूरध्वनी | मोबाईल |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्री. केमकर अशोककुमार गौतमचंद | रत्नतारा प्रिंटर्स | २/८/१९४३ | २४२६१५९३ | - |
| २) | श्री. देशपांडे दिलीप माधव | पेन्टाफोल्ड | ५/८/१९५९ | २४४६१०३१ | ९८२३०३९८१० |
| ३) | श्री. रजपूत मदनसिंह प. | करण प्रिंटर्स | १५/८/१९५५ | - | ९३७०१२१६२१ |
| ४) | श्री. जागडे कृष्णा राघू | योगीराज प्रिंटर्स | १५/८/१९७१ | - | ७७९८४६०२४० |
| ५) | सौ. गड्डम लक्ष्मी राजवर्धन | समर्थ प्रोसेस | १६/८/१९६८ | २४४९५२१६ | - |
| ६) | श्री. शाह भोगीलाल भागचंद | शाह प्रिंटर्स | ३१/८/१९३३ | २४२६२९९९ | - |

# गीता प्रेस

**नंदकिशोर मुळे**
महाराष्ट्र मुद्रण परिषदेच्या 'मुद्रा' मुखपत्राचे माजी संपादक, औरंगाबाद.
मोबाईल : ९४२२७ ०७७१६



मी टीव्हीवर गीता प्रेस शताब्दी सोहळ्याचा राष्ट्रपतींचा कार्यक्रम पाहत होतो. महाराष्ट्र मुद्रण परिषदेच्या 'मुद्रा' मुखपत्राचे माजी संपादक श्री. नंदकिशोर मुळे यांना फोन केला. त्यांना तो कार्यक्रम पाहायला सांगितले पण तो पाहता न आल्याने त्यांनी काहीं अंश यू-ट्यूबवर पाहिले, बातम्या वाचून माहिती घेतली. गीता प्रेस त्यांच्या आवडीचा विषय! त्या प्रगती, प्रभावाचा आपल्या सगळ्या मुद्रकांना आनंद मिळावा म्हणून त्यांनी हा अभ्यासपूर्ण लेख लिहून अवलोकनासाठी मला पाठवला. हा विस्तृत माहितीचा लेख आपल्याला नक्कीच आवडेल. भारतीय मुद्रक म्हणून आपल्याला गीता प्रेसच्या शतकपूर्ती प्रवेशापर्यंतच्या वाटचालीचा अभिमानही वाटेल! लेख मोठा असला तरी औरंगाबादच्या नंदकिशोरजी मुळे यांनी या संकलनासाठी घेतलेले श्रम, केलेले प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत.

– **प्रकाश आपटे,** सांगली.

एखाद्या नावातच सगळं गाव असतं! गोरखपूर या गावाचं उदाहरण घ्या, मग सगळं काही सांगायची गरजच नाही. तरी गीता प्रेस म्हटलं तर गोरखपूर आणि गोरखपूर म्हटलं तर गीता प्रेस!

हिंदू धर्मातील रामायण, महाभारत व गीता तत्त्वज्ञानाचे एकनिष्ठतेने मुद्रण करणारे गीता प्रेस सर्वांना ज्ञात आहे. ही मुद्रण प्रकाशन संस्था शतकपूर्तीकडे यशस्वी मार्गक्रमण करीत आहे.

गीता प्रेस म्हटले की, गेली ९९ वर्षे छापली गेलेली रामायण, महाभारत, गीता, कल्याण मासिक आणि सगळी धार्मिक पुस्तकं आपल्या डोळ्यापुढे उभी राहतात, आठवतातही! कदाचित प्रत्येकानं ती चाळली आहेत, पाहिली आहेत. गीता प्रेस हे नावंच असं आहे की, त्या नावा मागील सगळं धार्मिक साहित्य, छपाईच्या प्रतिष्ठेचा इतिहास प्रत्येक भारतीयाच्या मनामनातून मोठ्या अभिमानाने उभा राहतो!...

**बस नाम ही काफी है!**

**असं म्हणण्यापेक्षाही ज्या 'गीता प्रेस'ने भारतीय जनमानसावर केलेले उपकार, दिलेले प्रेम, निर्माण केलेले आदर्श सगळं काही अपरिमित संस्कार करणारी आहेत.**

गीता प्रेसने शंभर वर्षे अव्याहत, अखंड दाखवलेली धर्म संस्थापनार्थ सेवा, कर्तृत्व केवळ थोरच म्हणावं लागेल!... आणि ते तस्सं आजही आहे! असे धर्म प्रसार, प्रचाराचे पुण्यकर्म गेल्या हजार वर्षात झाले नाही आणि यानंतर हेच कार्य एकमेवाद्वितिय ठरणार आहे यात शंका नाही!

उत्तर प्रदेशातील गोरखपूर शहरात स्थापन झालेले गीता प्रेस येत्या काही महिन्यांनी संस्थेच्या स्थापनेची १०० वर्षे पूर्ण करणार आहे. शताब्दी वर्षात प्रवेश होत असल्यानिमित्त संस्थेतर्फे वर्षभर शतक महोत्सवी उत्सव साजरा होणार आहे. भारतीय भाषेत छापलेल्या धार्मिक पुस्तकांच्या ९० करोड प्रती - या दृष्टीने गीता प्रेस हे जगातील सर्वात मोठे धार्मिक प्रकाशन केंद्र ठरले आहे. २३ एप्रिल २०२२ पासून शताब्दी वर्ष महोत्सवाची एक अनौपचारिक सुरुवात झाली आहे.

प्रकाशनांच्या मागणीचा मोठा भार पूर्ण करण्यासाठी गीता प्रेस मॅनेजमेंटने जपानमधून ४० दशलक्ष किमतीचे नवीन कोमोरी हे कलर प्रिंटिंग मशीन खरेदी केले आहे. हे प्रिंटिंग मशिन आयात करण्याचा खास उद्देश म्हणजे यामुळे साचलेल्या मागणीनुसार धार्मिक पुस्तके लोकांपर्यंत पोहोचवता येतील. कोरोनाच्या काळात छपाई न झाल्यामुळे गीता प्रेसमधील १०० हून अधिक प्रकाशनांचा साठा संपला होता. तो पुन्हा पूर्ववत करण्यासाठी जपानकडून नवीन मशीन खरेदी करण्याचा निर्णय घेतला गेला. चार रंगी छपाई करणारे हे अद्ययावत मशीन उभारण्यासाठी पाच कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. या मशीनद्वारे एका तासात सुमारे १५ हजार मोठी रंगांत पाने छापली जातील. KOMORI LITHRONE G37 २५ इंच बाय ३७ इंच आकाराचे असून ताशी १५ हजारच्या गतीने चार रंगात छपाई करणारे छपाई यंत्र हे गीता प्रेससाठी एक वरदानच ठरणार आहे.

या नवीन प्रकल्पाचे औपचारिक उद्घाटन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते झाले होते. मुख्यमंत्र्यांनी मशीनच्या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी गीता प्रेसच्या कार्यास शुभेच्छा देऊन भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी शतक महोत्सवी शुभारंभ कार्यक्रमास उपस्थित राहण्यास संमती दिली आहे हे सांगितले.

सुसज्ज आधुनिक तयारीनिशी ४ जून २०२२ ला शतक महोत्सवी वर्षाच्या भव्य दिव्य सोहळ्याचा शुभारंभ माननीय राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते करण्यात आला.

गीता प्रेस शताब्दी वर्ष समारंभ शुभारंभ प्रसंगी राष्ट्रपती माननीय रामनाथ कोविंद, त्यांच्या पत्नी भारताच्या प्रथम महिला सविता कोविंद यांचे गीता प्रेस, गोरखपूर येथे राज्यपाल आनंदीबेन पटेल आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी स्वागत केले.

राष्ट्रपती रामनाथ कोविंद शताब्दी वर्ष उद्घाटन प्रसंगी बोलताना म्हणाले की, ''गीता प्रेसच्या या शतक महोत्सवी वर्षाचा शुभारंभ माझ्या हस्ते होत असताना मी स्वतःला अतिशय भाग्यशाली समजतो. हा केवळ योगायोग नसून आमच्या उभयतांच्या पूर्वसंचितातले पुण्य कामाला आले असावे.

''भारताचा इतिहास प्राचीन काळापासून धर्म संकल्पना, अध्यात्म आणि विश्वासावर ठामपणे उभा आहे. जगामध्ये आमच्या संस्कृतीला तोड नाही. आमच्या धर्मातील पुरातन साहित्य व संस्कार विश्वभरात श्रेष्ठ मानले जातात. हा धार्मिक संस्कृतीचा वसा, आध्यात्मिक ज्ञान आणि संस्कार केवळ भारतातच नव्हे तर जगभरातील कानाकोपऱ्यात पोहोचवण्याचे मोठे योगदान गीता प्रेस गोरखपूरने पेलले आहे.''

या प्रसंगी गीता प्रेसचे संस्थापक जयदयाल गोयंका द्वारा रचित गीता तत्त्व विवेचन व संपूर्ण श्रीरामचरितमानस असे बहुरंगी चित्रांच्या दोन ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी राज्यपाल, मुख्यमंत्री यांच्या सोबत गीता प्रेसला सदिच्छा भेट दिली. प्रेसमधील लीला चित्र मंदिरचे दर्शन घेतले. मंदिरात देव आणि देवतांची विविध चित्रे आहेत जी गीता प्रेसच्या पुस्तकांच्या आणि धर्मग्रंथांच्या मुखपृष्ठावर वापरली जातात त्यांचे सर्व माननीय मंडळींनी अवलोकन केले. राष्ट्रपतींनी सुमारे एक तास गीता प्रेस परिसराचे प्रशंसापूर्वक अवलोकन केले. तसेच गीता प्रेसच्या सर्व अधिकाऱ्यांची आणि कर्मचारीवृंदाशी पण संवाद साधून भेट घेतली.

मुख्य कार्यक्रम गीता प्रेसच्या प्रांगणात संध्याकाळी पार पडला.

**गीता प्रेसच्या स्थापनेचा इतिहास पाहणं रंजक ठरेल!**

हिंदू धर्म, तत्त्वज्ञान तसेच धर्म व धार्मिक गोष्टींवरील नितांत श्रद्धे पोटी जयदयाल गोयंका यांनी लोकांनी गीता ऐकावी वाचावी या उद्देशाने भगवद्‌गीतेचं मुद्रण कलकत्त्यातील एका मुद्रणालयातून करून घेतलं. तेव्हा कदाचित मुद्रण तंत्राचा आविष्कार, विकास देवनागरी लिपीत पूर्णपणे रुजला नसावा. त्यातील त्रुटी गीतेच्या छपाईतून गोयंका यांच्या लक्षात आल्या. छपाईदरम्यान बऱ्याच अक्षरांमध्ये मात्रा, उकार, रफार, पृथ्वी चिन्ह आदींच्या चुकांनी त्यांना व्यथित केलं. त्यांची ही व्यथा गोरखपूरच्या सेठ घन:श्यामजी जालान यांच्या कानापर्यंत पोहोचली. झालं! शुद्ध स्वरूपात स्वस्त धार्मिक पुस्तकं छापण्याचा १९२० सालात झालेला विचार १९२३ मध्ये प्रत्यक्षात आला. यासाठी गीता प्रेसची स्थापना १९२३ साली गोरखपूरमध्ये झाली. केवळ दहा रुपये भाडं असलेल्या एका घरामध्ये गीता प्रेस सुरू झाले. अतूट आस्थेतून सुरू झालेला या अश्वमेध यज्ञाचा श्रीगणेशा भारताचे पहिले राष्ट्रपती डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते करण्यात आला. हे नमूद करताना राष्ट्रपती डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांना पूर्वीपासूनच सनातन हिंदू धर्म साहित्याविषयी किती प्रेम होतं हे जाणवतं! आणि ते किती लोकप्रिय नेते होते हेही लक्षात येतं!

आजतागायत म्हणजे ९९ वर्षांत गीता प्रेसने १५ भाषेतील ९० करोड पुस्तकांचं मुद्रण प्रकाशन केलं आहे. २०१९-२० या एका वर्षात ५०० टन कागदावर उच्चांकी छपाई झाली. यावरून गीता प्रेसमध्ये छापल्या गेलेल्या धार्मिक पुस्तकांची लोकप्रियता किती मोठी आहे हे लक्षात येतं. देशातील कुठल्याही मोठ्या प्रकाशन संस्थेपेक्षा गीता प्रेसमधील कागदाची मागणी २० टक्के जास्त आहे.

आज एखादा साधा व्यवसाय सुरू करतानासुद्धा एखाद्याला किती पळापळ करून अनेक गोष्टींची पूर्तता करावी लागते हे सगळ्यांना माहितीच आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात हा मुद्रण, प्रकाशन प्रपंच आणि तोही सत्य-शांती आणि मानवतेच्या दृष्टिकोनातून नैतिकतेवर आधारित, धार्मिक स्वरूपाचा, सुरू करताना संस्थापक जालान आणि गोयंका यांनी काय कष्ट उपसले असतील हे देव जाणे! गोविंद भवन कार्यालय (कलकत्ता) कोलकत्ता या संस्थेचे १८६० च्या (सध्याच्या वेस्ट बंगाल सोसायटी ॲक्ट १९६० अंतर्गत) सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्टखाली नोंदवली गेलेली ही संस्था असून गीता प्रेस, गोरखपूर, येथे या संस्थेचे मुद्रणालय आहे. जगात 'सत्यं वद धर्मं चर' या हेतूनं आध्यात्मिक व नैतिक विचारांचा प्रचार व प्रसार करणे हे या संस्थेचे ध्येय आहे.

भारतातील नावीन्यपूर्ण हिंदू धार्मिक पुस्तकं वाचन संस्कृती विकसित करण्यात गीता प्रेसचा मोठा सहभाग आहे. १९२३ पासून ९० कोटी प्रकाशित पुस्तकांची विक्री करून, पुढील वर्षी १०० वर्ष पूर्ण करणाऱ्या गीताप्रेसने भारताचे आध्यात्मिक आणि सांस्कृतिक ज्ञान जागतिक स्तरावर पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. हिंदू धर्मग्रंथ शुद्ध स्वरूपात देण्याच्या उद्देशाने सुरू झालेले हे कार्य, हिंदू धार्मिक ग्रंथांच्या जगातील हे सर्वांत मोठे प्रकाशक आहेत आणि कंपनीच्या संग्रहात भगवद्‌गीतेच्या १०० हून अधिक समर्पक व्याख्यांसह ३,५०० हस्तलिखिते आहेत.

गीता प्रेस गोरखपूरचे अध्यक्ष आणि सनातन धर्माच्या प्रसिद्ध कल्याण मासिकाचे संपादक राधेश्याम खेमका यांनी ४० वर्षे गीता प्रेसच्या आपल्याकडे आलेल्या दायित्वाची भूमिका अतिशय निष्ठेने सांभाळली. याचबरोबर त्यांनी गीता प्रेसमधून प्रकाशित होणाऱ्या अनेक धार्मिक ग्रंथ, पुस्तकं, मासिकांच्या संपादकत्वाची भूमिका मोठ्या जबाबदारीने पार पाडली. मृदुवाणी, सरळ स्वभाव हे राधेश्याम खेमका यांचे वैशिष्ट्य होते. त्यांचे वडील सीताराम खेमका मूळतः बिहारमधील मुंगेर जिल्ह्यातून वाराणसीला आले होते. गीता प्रेस १५ भाषांमधून १८०० निरनिराळी पुस्तकं प्रकाशित करतात. काही पुस्तकं गीता प्रेस आजही केवळ दोन रुपये किंमतीत देतात. हिंदूंना शिरोधार्य असलेली गीता तसेच गीतेवरील अनेक विश्लेषणात्मक, चर्चात्मक ग्रंथ, पुस्तकांच्या प्रकाशनाला प्रकाशकांनी महत्त्व दिले आहे. याव्यतिरिक्त रामायण, महाभारत,







पुराणं, उपनिषदं व अन्य धार्मिक गोष्टींसंबंधित जगातील विचारवंत, गुरू, संत यांचे साहित्य छापण्यात गीता प्रेस अग्रेसर आहे. या सर्व साहित्यांचे अनेक भारतीय प्रादेशिक भाषांमध्ये भाषांतरे सतत प्रसिद्ध होत असतात. याच सोबत कल्याण व कल्पतरू या मासिकांचे नियमित प्रकाशनही चालू आहे. सन १९२६ पासून कल्याण मासिकाचे प्रकाशन चालू आहे. आपल्या सर्वांसाठी विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे कल्याण मासिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन १९२६ साली मुंबईहून झाले होते. काहीशा साध्या स्वरूपातील कल्याण मासिकाचे पहिल्या वर्षीचे १२ अंक मुंबईतच छापले गेले होते.

१९२७ पासून मासिकाचे नियमित प्रकाशन सुरू झाल्यावर एक वार्षिक विशेषांक 'भगवानम् अंक' प्रकाशित व्हायला लागला. ९५ वर्षे या विशेष अंकांचे प्रकाशन चालू आहे. ९५ वा अंक गणेश पुराण विशेषांक म्हणून प्रसिद्ध झाला आहे.

शतक महोत्सवी वर्षात 'कल्याण' मासिकाचा एक प्रातिनिधिक विशेषांक प्रकाशित करण्याचे ठरवले आहे. शतक महोत्सवी वर्षात आतापर्यंतच्या सर्व कल्याणच्या अंकांमधील वैशिष्ट्यपूर्ण लेखांचे व चर्चिल्या गेलेल्या कल्याणकारी योजनांचे एकत्रित संकलन या विशेषांकात केले जाईल. अशा प्रसिद्ध झालेल्या विशेषांकात सर्वसंग्रहक सर्वोत्तम गोष्टी एकाच पुस्तकात वाचकांना पाहायला मिळाव्यात अशी इच्छा गीता प्रेसचे विश्वस्त देवीदयाल अग्रवाल यांनी व्यक्त केली आहे. हा शतक महोत्सवी विशेषांकच ठरेल. हे वर्ष अतिशय संस्मरणीय ठरावे म्हणून गीता प्रेस व सर्व संबंधित प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यासाठी सज्ज आहेत.

गीता प्रेसची स्थापना जय दयाल गोयंका आणि घनःश्याम दास जालान यांनी हिंदू धार्मिक ग्रंथ आणि पुस्तके प्रकाशित करण्यासाठी गोरखपूरमध्ये १९२३ मध्ये ना-नफा संकल्पनेसह झाली होती. १० रुपयांच्या भाड्याच्या घरातून सुरू झालेला प्रवास १५ भाषांमध्ये सुमारे १८०० पुस्तके प्रकाशित करीत शतकोत्तरी चालू राहणार आहे. आजही गीता प्रेसमध्ये दोन रुपयांची धार्मिक पुस्तके उपलब्ध आहेत. पवित्र गीता आणि तिची व्याख्या, पवित्र महाकाव्ये रामायण, महाभारत, पुराणे, उपनिषदे, विविध संत आणि गुरूंचे कार्य, तत्त्वज्ञान इ. प्रकाशित झाले आहेत. या सर्वांचे प्रादेशिक भाषांमध्ये भाषांतरही झाले आहे. कल्याण, कल्पतरू ही मासिकेही प्रकाशित होत आहेत.

सत्यं वद धर्मं चर या शीर्षक बोधवाक्याला प्रमाण मानत गोरखपूरच्या 'गीता प्रेस'ने शतकापूर्ती वर्षात पदार्पण केले आहे. शतकपूर्ती निमित्ताने सर्व स्वाभिमानी भारतीयांसोबत आम्हा 'अखिल भारतीय मुद्रकांचे, मुद्रक संघटनांचे 'गीता प्रेस, गोरखपूर'ला कोटी कोटी प्रणाम!

## मुद्रक बंधूंना आवाहन

**मा. आयुक्त, पुणे पोलीस यांच्या आदेशानुसार धार्मिक, सामाजिक तेढ निर्माण करणारे कोणतेही साहित्य जसे हँडबील, पुस्तकं, पत्रके, फ्लेक्स, व्हाट्सएप डिझाइन्स इत्यादी तयार करून छापण्यात येऊ नयेत तसेच अश्या प्रकारचे काम आपल्याकडे कोणी घेऊन आल्यास त्याला तत्काळ नकार द्यावा व आपल्या कर्मचारी, सहकारीवर्गास सुद्धा याची कल्पना देण्यात यावी, असे सांगण्यात आले आहे.**

**समाजात कायमच सलोख्याचे वातावरण राहावे, यासाठी आपण सर्वांनी सतर्क राहून आपल्यामार्फत किंवा आपल्या कर्मचारी वर्गाकडून वरील आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.**

# DEVICES

**Every Printer should have...**





## PULLERS

**What are pullers used for?**

A puller is a tool used to remove parts such as bearings, pulleys or gears from a shaft. They have legs, typically two or three which circle around the back or inside of a part and they also have a forcing screw which centres up against the end of a shaft.

**What is a mechanical puller?**

Mechanical pullers work by rotating a crossbar which moves the centre bolt/force screw towards the shaft. Hydraulic pullers include an integral hydraulic cylinder that is powered by a pump to apply the required force.

These pullers include bearing splitter plates, 2 and 3 arms bearing pullers, internal bearing pullers, bar type puller & slide hammer puller.

- Bearing Splitter Plates.
- 2&3 Arms Bearing Puller.
- Internal Bearing Puller.
- Bar type Puller with Bearing Separator

**What is a 3-jaw puller used for?**

You can use them to remove gears, pulleys, wheel hubs, all kinds of hard to remove parts. They come in several sizes and are inexpensive. Every garage should have three sizes of 3-jaw pullers in the drawer.

**How do I choose a bearing puller?**

The decision of which puller to use is dependent on many factors. You'll first need to establish whether you need an external or an internal bearing puller. If the component that you're removing is seated on a shaft and is freely accessibly from the outer diameter, you'll need an external bearing puller.

# विनम्र श्रद्धांजली



## श्री. विलास देशपांडे

विनायक आर्टस्‌चे संस्थापक श्री. विलास देशपांडे यांचे वयाच्या ७७ व्या वर्षी दिनांक ४ जून २०२२ रोजी दु:खद निधन झाले. १९८७ साली जेव्हा मी प्रिंटिंग व्यवसायात आलो तेव्हा कामानिमित्त विलास देशपांडे यांना प्रथम भेटलो आणि तेथून पुढे आमची चांगली मैत्री झाली.

विनायक आर्टस् ही प्रेस श्री. विलास देशपांडे यांनी खूप मेहनतीने उभी केलेली संस्था होती. Swift Offset Printing Machine चे उत्तम तंत्रज्ञ म्हणून त्यांनी त्यांच्या करीअरची सुरुवात केली आणि काही काळातच Swift कंपनी सोडून त्यांनी स्वत:चा प्रेस विनायक आर्टस् नावानी सुरू केला. Swift Single कलर मशीनवर ते अतिशय उत्तम फोर कलर छपाई करू लागले आणि नंतर सिंगल कलर Dominant Machine वरदेखील उत्तम फोर कलर छपाई सुरू केली.

१९८० च्या काळात जेव्हा प्रिंटिंग तंत्रज्ञान आजच्या एवढे अद्ययावत नव्हते तेव्हा ते पुण्यात फोर कलर छपाई करत होते. पुणे प्रिंटिंग इंडस्ट्रीबद्दल बोलायचे झाले तर विलास देशपांडे हे पुण्यात फोर कलर छपाईचे पायोनिअर म्हणावे लागेल. ग्राहकांना उत्तम दर्जाची छपाई द्यावी यासाठी ते प्लेटस् मुंबईतील सुप्रेसा या Pre-Press Unit मधून करून आणत होते. पुढे काही वर्षांनी त्यांनी Heidelberg 2 Colour Machine आणले व त्यावर अधिक चांगली छपाई करू लागले. १९९० च्या दशकात विनायक आर्टस् हे नाव पुण्यातील एक अतिशय उत्कृष्ठ छपाई करणारा प्रेस म्हणून नावारूपाला आले.

विलास देशपांडे सर हे कामाच्या बाबतीत अतिशय शिस्तप्रिय व कडक होते. जॉब आल्यावर जॉब बॅगवर त्यांची सूचना लिहिण्याची पद्धत इतकी अचूक असायची की पुढे प्रत्येक स्टेपमध्ये काम करणाऱ्या माणसाला कधीही अडचण येत नसे. त्यांचा प्रेस अतिशय स्वच्छ आणि नीटनेटका असायचा. ते न चुकता स्वत: सर्व मशीनचे मेंटेनन्सचे काम वेळेत करत असत.

१९८५ च्या काळात फार मोजके लोक Drupa Exhibition साठी जर्मनीला जात असत. विलास देशपांडे सर हे त्यापैकी एक होते. Exhibition मधून अनेक प्रकारची विविधता असलेली सॅम्पल्स् आणि नवीन तंत्रज्ञान असलेला मशीनची ब्रोशर्स ते घेऊन येत असत आणि अनेक तरुण प्रिंटर्स आणि जाहिरात एजन्सीजच्या लोकांना ते दाखवून त्याबद्दल माहीती देत असत आणि माझ्यासारख्या अनेक तरुण प्रिंटर्सना आग्रह करत की तुम्ही International Exhibitions ला जायला पाहिजे. त्याने तुमची व्हिजन खूप वाढते.

आज देशपांडे सर आपल्या मध्ये नाहीत पण आजही त्यांची आठवण येते ती त्यांनी प्रेसचे काम कसे करावे याबद्दल दिलेल्या शिकवणीमुळे... सर, तुम्हाला विनम्र श्रद्धांजली.

– गिरीश राव


HEIDELBERG
Speedmaster
Speedmaster CX 104
TURNING IDEAS INTO PROFIT.
How can you meet the increasing demands of the printing market? The Speedmaster CX 104 has the answer: Easy job changes and a wide range of inline finishing operations paired with an innovative operating concept and intelligent automation. And all that tailored to your business model.
For more technical information and Speedmaster CX 104 pricing details, please contact:
Mr. Viraj Damle, Cluster Sales Head - West
E-mail: viraj.damle@heidelberg.com
Mobile: + 91 98208 61050
HEIDELBERG
See for yourself: heidelberg.com/cx104

# Experience the Future... Now!




## HP and TechNova form a formidable partnership to offer next-gen Digital Presses for Folding Cartons, Labels and Publishing.



HP Indigo 35K : B2 Digital Press for Folding Cartons


HP Indigo 6K : Narrow-web Digital Press for Labels


HP T250 HD : PageWide Web Digital Press for Publishing

For a leap into the future, please contact :

**TechNovaCare**
Toll-free (India) : 1 800 267 7474
Phone : +91 22 2741 5474
eMail : help@technovaworld.com
Web : www.technovaworld.com

Scan QR Code for more information

hp

TechNova